गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८



दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक ३२ वा ● रविवार १८ जून २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| Volume 1 | Issue 32 | Date : 18/06/2023 | blow : Sunday | Page 4 | Price 4


### बिपरजॉय चक्रीवादळामुळे पाऊस लांबणीवर

## २३ जूननंतर पावसाची शक्यता हवामान विभागाचा अंदाज



नवी दिल्ली : सध्या देशाच्या किनारपट्टीवर बिपरजॉय चक्रीवादळाचं संकट आहे. गुजरातला धडकलेल्या या चक्रीवादळाचा परिणाम गुजरातसह संपूर्ण देशाच्या हवामानावर होत आहे. दरम्यान, यामुळे देशात काही भागात ऊन तर काही भागात पाऊस अशी परिस्थिती पाहायला मिळत आहे. दरम्यान, मान्सून पुन्हा एकदा लांबण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. आता २३ जूननंतर पावसाला पुन्हा सुरुवात होईल, अशी माहिती हवामान विभागाने दिली आहे.

सध्या राज्यासह देशात होणारा पाऊस हा चक्रीवादळाचा होणार परिणाम आहे. मान्सून सध्या स्थिरावला असून २३ जूनला महाराष्ट्र आणि मध्य भारतात पावसाला सुरुवात होण्याची शक्यता आहे, अशी माहिती हवामान विभागाने दिली आहे. दरम्यान, दक्षिण आणि ईशान्य भारतात १८ ते २१ जून दरम्यान पावसाच्या सरी कोसळण्याची शक्यता आहे.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, या आठवड्यात पावसाची शक्यता नाही. त्यानंतरच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या आठवड्यात जोरदार पावसाची शक्यता असून त्या पुढील आठवड्यात सरासरी पाऊस पडेल, असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. यामुळेचक्रीवादळामुळे लांबणीवर गेलेला पाऊस आता आणखी रखडण्याची चिन्हं असल्याचं दिसत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरणी करण्यापूर्वी योग्य काळजी घेण्याचं आवाहन हवामान विभागाकडून करण्यात आलं आहे.

मान्सून पुन्हा एकदा लांबल्यामुळे नागरिकांची निराशा झाली असून बळीराजाची चिंतेतही वाढ झाली आहे. राज्यातही अनेक भागात अद्याप मान्सून दाखल झालेला नाही. कोकण आणि मध्य महाराष्ट्रात पावसानं हजेरी लावली आहे. विदर्भासह मराठवाड्यातील शेतकऱ्यांची प्रतीक्षा कायम आहे. त्यामुळे त्यामुळे शेतकऱ्यांना । पान २ वर

## महाराष्ट्राला नवी दिल्लीत ३ राष्ट्रीय जल पुरस्कार प्राप्त

### साताऱ्यातील मलकापूर, जालन्यातील कडेगाव यासह भारतीय जैन संघटनेस पुरस्कार



नवी दिल्ली : पाणी व्यवस्थापन, संवर्धन आणि पाण्याचा पुनर्वापर उत्कृष्ट पद्धतीने केल्याबद्दल महाराष्ट्राच्या सातारा जिल्ह्यातील मलकापूर नगरपरिषदेस, जालना जिल्ह्यातील कडेगाव ग्रामपंचायतीला आणि भारतीय जैन संघटनेस उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या उपस्थितीत आणि केंद्रीय जलशक्ती मंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांच्या हस्ते आज चौथ्या राष्ट्रीय जल पुरस्काराने गौरविण्यात आले. येथील विज्ञान भवनात केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाच्यावतीने आज चौथ्या राष्ट्रीय जल पुरस्कार प्रदान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी केंद्रीय जल शक्ती राज्यमंत्री प्रल्हाद सिंह पटेल आणि विश्वेश्वर टुडू, तसेच केंद्रीय सचिव पंकज कुमार उपस्थित होते.

कार्यक्रमात विविध श्रेणीत प्रथम आलेल्या राज्यांना, शहरांना, महानगर पालिकांना, नगर पालिकांना, ग्राम पंचायतींना उपराष्ट्रपती यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. द्वितीय आणि तृतीय क्रमांकांचे पुरस्कार केंद्रीय मंत्री श्री. शेखावत यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. सन्मान चिन्ह, प्रमाण पत्र आणि रोख रक्कम असे पुरस्काराचे स्वरूप आहे.उत्कृष्ट ग्राम पंचायत पुरस्कार या श्रेणीमध्ये जालना जिल्ह्यातील कडेगाव ग्राम पंचायतीला तिसरा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्कार सरपंच दत्तु निबांळकर, माजी सरपंच भीमराव जाधव आणि खरपूडी येथील कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख डॉ एस.व्ही. सोनुने यांनी स्वीकारला. हा पुरस्कार मेघालय राज्यातील री भोई जिल्हा येथील मावकिर्देप या ग्राम पंचायती सोबत विभागून मिळालेला आहे.

कडेगाव हे खरपुडी येथील कृषि विज्ञान केंद्राच्या अंतर्गत येते. राष्ट्रीय नाविन्यपूर्ण हवामान लवचिक कृषी कार्यक्रम (NICR-- National Innovative Climate Resilient -griculture program) प्रकल्पा अंतर्गत २०१५-१६ मध्ये कडेगावाला दत्तक घेण्यात आले. या गावात भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या मार्गदर्शनानुसार विविध हवामान अनुकूल उपक्रम राबविण्यात आले आहेत. त्यापैकी नैसर्गिक साधनसंपत्ती व्यवस्थापन या घटका । पान २ वर

## मणप्पुरम फायनान्सला आरबीआयचा दणका!

### २० लाखांचा दंड ठोठावला

नवी दिल्ली : मणप्पुरम फायनान्स लिमिटेडला मोठा झटका बसला आहे. भारतीय रिझर्व्ह बँक म्हणजेच RBI ने मणप्पुरम फायनान्सला २० लाख रुपयांचा आर्थिक दंड ठोठावला आहे. मणप्पुरम फायनान्स ही खाजगी कंपनी ही खाजगी कंपनी लोकांना कर्ज देण्याचं काम करते. नियमांचं उल्लंघन केल्यामुळे रिझर्व्ह बँकेने मणप्पुरम फायनान्स कंपनीला हा दंड ठोठावला आहे.

NBFC नियमांच्या काही तरतुदींचे पालन न केल्याबद्दल RBI ने मणप्पुरम फायनान्सला दंड ठोठावला आहे. रिझव्ह बँकेने सांगितलं की, कोणताही व्यवहार किंवा करारावर याचा परिणाम होणार नाही. भारतीय रिजर्व्ह बँकेने नॉन-बँकिंग फायनान्स कंपनी मणप्पुरम फायनान्सला हा दंड ठोठावला. कंपनीने ९० दिवसांपेक्षा जास्त थकीत असलेल्या सोन्याच्या कर्ज खात्यांना नॉन-परफॉर्मिंग ॲसेट्स ) म्हणून वर्गीकृत केलं नाही. त्यामुळे हा दंड ठोठावण्याच आला आहे.नियामक त्रुटी आढळल्यामुळे मणप्पुरम फायनान्स गोल्ड लोन कंपनीवर हा दंड ठोठावण्यात आल्याची माहिती रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने दिली आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेने मणप्पुरम फायनान्सला २० लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (RBI) ने कंपनीची आर्थिक स्थिती तपासण्यासाठी मार्च २०२१ पर्यंत तपास केला होता. यानंतर कंपनीच्या स्थितीबाबत संपूर्ण अहवाल तयार करून निर्देश देण्यात आले आहेत. फायनान्स कंपनीने काही नियमांचे उल्लंघन केल्याचं भारतीय रिझर्व्ह बँकच्या तपासावेळी आढळूनं आलं. यामुळे आरबीआयने मणप्पुरम फायनान्स कंपनीला दंड ठोठावला. आरबीआयने कंपनीला ९० दिवसांपेक्षा जास्त काळ थकित असलेले गोल्ड लोन खाते वेगळं करण्यास सांगितलं आहे.

## भारताला आता ऊर्जेचा आयातदार होण्यापेक्षा ऊर्जेचा निर्यातदार होणं गरजेचं : नितीन गडकरी



नवी दिल्ली :भारताची भविष्यातील सामाजिक सुरक्षा, आर्थिक भागीदारी आणि रोजगार निर्मितीसाठी तरुणाईने आपले योगदान द्यावे. तसेच आर्थिक विषमता दूर सारून आर्थिक समता प्रस्थापित करावी असे आवाहन केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी केलं. विद्यार्थी वर्गाची ध्येय ही भारताच्या आर्थिक वाढीसाठी पोषक आहेत. युवकांची व्यक्तिमत्वे, व्यावसायिक दृष्टिकोन, संघकार्याची भावना, तंत्रस्नेही कौशल्ये अजून विकसित व्हायला हवीत असेही गडकरी म्हणाले. वनामती नागपूर येथे आयोजित 'मेगा सीए स्टुडन्ट कॉन्फरन्स' या भारतीय सनदी लेखापाल संस्थेनं आयोजित केलेल्या परिषदेत ते बोलत होते. भारताला आता ऊर्जेचा आयातदार होण्यापेक्षा ऊर्जेचा निर्यातदार होणे अत्यंत गरजेचे आहे. यासाठी प्रत्येक गोष्टीचे लेखापरीक्षण होणे आवश्यक आहे.

सनदी लेखापाल यांची देशाच्या आर्थिक जडणघडणीत महत्वाची अशी भूमिका आहे. त्यांचे लेखापरीक्षण अहवाल पाहूनच देशाची आर्थिक स्थिती जगापुढे मांडता येऊ शकते. कायद्याप्रती सन्मान, पारदर्शकता ठेवून हे लेखापरीक्षणाचे क्षेत्र अजून समृद्ध करत रहावे या शुभेच्छा गडकरींनी । पान २ वर

## अनिल जयसिंघानीला ईडीचा दणका..!


### ३.४० कोटी रुपयांची मालमत्ता ईडीकडून जप्त



: क्रिकेट बुकी अनिल जयसिंघानीला अंमलबजावणी संचालनालय म्हणजेच ईडीनं दणका दिला आहे. अनिल जयसिंघानी याची ३.४० कोटी रुपयांची मालमत्ता ईडीकडून जप्त करण्यात आली आहे. अंमलबजावणी संचलनालयाने याबाबत माहिती देताना शनिवारी जाहीर केलं आहे की, अनिल जयसिंघानीची ३.४० कोटी रुपयांची मालमत्ता जप्त केली आहे. पीएमएलए म्हणजे आर्थिक गैरव्यवहार प्रतिबंध कायद्यानुसार ही कारवाई करण्यात आली आहे. आर्थिक गैरव्यवहार प्रकरणाशी संबंधित गुजरातमधील क्रिकेट बुकी अनिल जयसिंघानीच्या मालकीची मालमत्ता ईडीने जप्त केली आहे.

बुकी अनिल जयसिंघानी विरोधात ईडीने आरोपपत्रही दाखल केलं असल्याची माहिती दिली आहे. गुजरातमधील वडोदरा पोलीस ठाण्यात २०१५ मध्ये नोंदवलेल्या एफआयआरच्या आधारे ईडीनं गुन्हा दाखल केला आहे. तपासादरम्यान, जयसिंघानी हा क्रिकेट सट्टेबाजीच्या क्रियाकलापांमध्ये गुंतलेला होता, असल्याचं समोर आलं आहे. तसेच मारुती-अहमदाबाद या सट्टेबाजीच्या । पान २ वर

## आंतरराष्ट्रीय योगदिनी विधानभवनाच्या प्रांगणात मान्यवरांच्या सहभागात योगासनांची प्रात्यक्षिके



मुंबई : यंदाच्या वर्षी आंतरराष्ट्रीय योगदिनी म्हणजेच बुधवार, दिनांक २१ जून, २०२३ रोजी प्रात:काली विधान भवनाच्या प्रांगणात योग प्रात्यक्षिकाचा कार्यक्रम विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आला आहे. सन्माननीय विधिमंडळ सदस्यांसह सुमारे २००० योगप्रेमी याप्रसंगी उपस्थित राहणार आहेत. सकाळी ७ ते ९.०० यावेळेत 'योगप्रभात विधानभवन' हा कार्यक्रम होईल. यावेळी विशेष अतिथी म्हणून माननीय राज्यपाल श्री. रमेश बैस, माननीय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित राहणार आहेत. विधानपरिषदेच्या माननीय उप सभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ यांची या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती लाभेल तसेच विशेष निमंत्रित म्हणून सर्व मंत्रीगण, माननीय विधानपरिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, माननीय विधानसभा विरोधी पक्षनेते अजित पवार हे उपस्थित राहतील.

योगविद्या आणि ध्यानधारणा ही आपल्या भारतीय संस्कृतीकडून अखिल विश्वाला लाभलेली अनमोल देणगी आहे. २१ जून हा दिवस । पान २ वर

## लोकसभा निवडणुकीत लोक भाजपला नाकारतील : पवार



जळगाव : देशामध्ये विविध राज्यांचे राजकीय चित्र बदलत आहे. गोवा, मध्य प्रदेश, आणि महाराष्ट्रात भाजपचे सरकार नव्हते. भाजपने काँग्रेसचे आमदार फोडून सत्ता आणली. जनतेने त्यांना राज्यातील सत्तेपासून दूर ठेवले आहे आणि तसाच सूर केंद्राच्या निवडणुकींमध्ये असेल असा विश्वास राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी व्यक्त केला आहे. राष्ट्रवादी ग्रंथालय विभागाचे राज्य अधिवेशन शुक्रवारी अंमळनेरमध्ये झाले, यावेळी ते बोलत होते. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, माजी मंत्री एकनाथ खडसे, आमदार अनिल पाटील, जिल्हाध्यक्ष रवींद्र पाटील हे यावेळी उपस्थित होते. पवार म्हणाले की, केरळ, तमिळनाडू, कर्नाटक, तेलंगणा, ओडिशा, राजस्थान, दिल्ली, पंजाब, झारखंड, हिमाचल आणि पश्चिम बंगालमध्ये भाजप नाही. उत्तर प्रदेशात भाजप आहे. मध्य प्रदेशात देखील आहे. परंतु मध्य प्रदेशात भाजपचे राज्य नव्हते. तिथे कमलनाथ यांचे सरकार होते. भाजपने काँग्रेसचे आमदार फोडून सत्ता आणली. गोव्यात काँग्रेस होती. त्यांनी आमदार फोडले. खोक्याचा कार्यक्रम झाला. महाराष्ट्रातही खोक्यांचा कार्यक्रम झाला, असेही त्यांनी सांगितले. बहुसंख्य राज्यात लोकांनी भाजपला नाकारले आहे. त्यामुळे आता लोक देशपातळीवरही वेगळा विचार करतील असे वाटते. असे असेल तर एकत्र बसून सर्वांनी विचार केला पाहिजे. लोकांच्या इच्छांची पूर्तता केली पाहिजे. देशात शेतीमालास भाव नाही, बेरोजगारीचा प्रश्न मोठा आहे. या सर्व गोष्टी बदलायच्या असतील तर परिवर्तन हाच त्यावर पर्याय आहे, असे देखील त्यांनी सांगितले. वंचित बहुजन आघाडी भाजपची 'बी' टीम आहे, अशा शब्दांत पवार यांनी वंचित आघाडीवर टीकास्त्र सोडले.

## बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांनी घेतली बैठक; गृह विभागाला सुनियोजनाचे निर्देश



मुंबई : आगामी बकरी ईद सणानिमित्त नियोजनाकरिता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली, उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत बैठक झाली.

सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे झालेल्या बैठकीस मुंबई शहर जिल्ह्याचे पालक मंत्री दीपक केसरकर, ग्राम विकास मंत्री गिरीष महाजन कृषी मंत्री अब्दुल सत्तार, आमदार अबू आझमी, आमदार रईस शेख, मुख्य सचिव मनोज सौनिक, गृह विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव सुजाता सौनिक, पोलीस महासंचालक रजनीश सेठ, मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर, मुंबई महापालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. आय.एस.चहल, जमाते उलेमाचे राज्याचे अध्यक्ष नदीम सिद्दीकी, विविध जिल्ह्यातून आलेले मुस्लिम धर्मगुरू आणि समाज बांधव संघटनांचे प्रतिनिधी आदी उपस्थित होते. बकरी ईदसाठी हेल्पलाईन सुरु केली जाईल. बाजार समित्यांच्या बाहेर बकऱ्यांची विक्री करण्यास परवानगी दिली जाईल. पशुवैद्यकीय तपासणी शुल्क पुर्वीप्रमाणेच आकारण्याचे निर्देश देण्यात येतील, असे निर्णय घेण्यात आले.

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, नेहमीच सर्व धर्मियांच्या सण-उत्सवाप्रमाणे बकरी ईद सणासाठी शासनाच्या वतीने नियोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील सण-उत्सवातील कायदा सुव्यवस्थेचे नेहमीच आदर्श म्हणून उदाहरण दिले जाते. आपण सर्व सण उत्सव नेहमीच सर्वधर्मीय बांधव एकत्र येऊन साजरे करतो. गणेशोत्सव, नवरात्रोत्सव, दिवाळी त्याचप्रमाणे ईद मध्येही आपला गृह विभाग नियोजन करत असतो. कायदा व सुव्यवस्था राखण्याची सर्वच धर्मियांची जबाबदारी आहे. शांतता व सुव्यवस्थेच्या माध्यमातून आपल्याला । पान २ वर

### ✻ सुविचार ✻

माणसाचे प्रेम हे धरती सारखे असते अगोदर एक दाणा पेरावा लागतो.

## संपादकीय

# लोकप्रतिनिधींचे कर्तव्यच आहे.

ग्रामपंचायती अनिष्ट रूढी-परंपरा संपुष्टात आणण्यासाठी आणि चांगले नवे पायंडे पाडण्यासाठी स्वयंस्फूर्त पुढाकार घेत आहेत. कामेरी ही सांगली जिल्ह्याच्या वाळवा तालुक्यातील एक ग्रामपंचायत. या ग्रामपंचायतीने साऱ्यांनीच स्वागत करावे, असा निर्णय घेतला आहे. गावातील सार्वजनिक कार्यक्रम, विवाह समारंभ, जयंती उत्सव अशा कार्यक्रमात ध्वनिवर्धक यंत्रणा आणि एलईडी लेसर किरण यांचा वापर करण्यावर कामेरी ग्रामपंचायतीने बंदी घातली आहे. तसा ठराव एकमताने संमत करण्यात आला, अशी बातमी माध्यमात झळकली आहे. सार्वजनिक कार्यक्रमात आवाजाची मर्यादा ओलांडून वाजणाऱ्या कर्णकर्कश डीजेचा अनेक लोकांना त्रास होतो. रक्तदाब वाढू शकतो. हृदयाची धडधड वाढू शकते. चिडचिड होते. ध्वनी प्रदूषणाचे अनेक दुष्परिणाम सांगितले जातात. याचा अनुभव सामान्य माणसे नेहमी घेतात. तथापि त्या त्रासाविरोधात तक्रार करण्याचे धाडस क्वचितच कोणी करतो. भांडणे, मारामारीला माणसे घाबरतात. वाद विकोपाला जाण्याची भीती अनेकांना वाटते. मंडळांच्या स्वयंघोषित कार्यकर्त्यांची आणि पाठीराख्यांची दहशत हेही त्यामागचे एक कारण असावे का? पुण्यातील नवी खडकी ागात नुकतीच एक घटना घडली. एका घरगुती कार्यक्रमात डीजे वाजत होता. त्याचा त्रास होत असल्याची तक्रार एका ज्येष्ठ नागरिकाने केली. त्यामुळे त्यांना अपमानित करून हाकलून लावल्याचे वृत्त माध्यमात प्रसिध्द झाले आहे. नवे पायंडे पडतात आणि स्वीकारलेही जातात. विधवा प्रथा बंद करण्याचा निर्णय एका ग्रामपंचायतीने घेतला आणि हळूहळू तो पायंडा पडला. अनेक ग्रामपंचायती त्यापासून प्रेरणा घेत आहेत. विधवांचा सन्मान राखत आहेत. रूढींमध्ये कालसुसंगत बदल करून तो अमलात आणणे सोपे नसते. अनेकांना त्यात बदल हवा असतो. तथापि सामाजिक परंपरांमध्ये बदल करण्याचे धाडस एकटी-दुकटी माणसे क्वचितच दाखवतात. तथापि लोक एकत्र आले तर गुणात्मक बदलांची प्रक्रिया थोडीशी सोपी होऊ शकते. लोकसहभाग बळकटी देऊ शकतो. कामेरी ग्रामपंचायतीचा निर्णय हा त्याचे चपखल उदाहरण. जनतेचे जगणे सुसह्य होईल याची दक्षता घेणे हे लोकप्रतिनिधींचे कर्तव्यच आहे.

# गंभीर घटनांना गांभीर्याने घेतले जात नाही

भारत हा जगातील सर्वच बाबतीत ताकदवर देश आहे. सर्व बाबतीत ताकदवर अजुनही भारत विकसित व महासत्ता बनु शकला नाही हि खुप मोठी खंत आहे. शिक्षण, आरोग्य या बाबतीत तर देशाने निच्चांक गाठला आहे. प्रत्येक नागरिक देशाच्या भरभराटीसाठी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष कर देत असतो. परंतु जगातील तीनशे आदर्श विद्यापिठामध्ये भारताचे एकही विद्यापीठ नाही याचा अर्थ आमची शिक्षण प्रणाली किती खराब झाली याची प्रचीती येते. किती ही गरिब व मध्यमवर्गीय व्यक्तीला एमर्जन्सी भरती करायचे तर सरकारी हॉस्पिटल नको वाटते कारण तेथील सुविधा व दिरंगाईने रुग्नाचे खच्चीकरण होते. शिक्षण आरोग्य ह्या बाबी प्रत्येक नागरिकांना मोफत व गुणवत्तेच्या मिळायलाच पाहिजे परंतु यावर कोणाचेही लक्ष नाही. अशा अनेक गंभीर घटना आहेत त्यावर गांभीर्याने विचार व्हायला पाहिजे होता परंतु त्यावर चर्चा न होता जाणिव पुर्वक ते विषय टाळले जातात. देशात सध्या हिंदु मुस्लिम वाद असेल मग ती अफवा का असेना तरीही इलेक्ट्रॉनिक मिडीया एवढ्या जोरजोरात प्रचार करते जस काय धर्म थोड्याच वेळात नष्टच होणार आहे. अनेक इलेक्ट्रॉनिक मिडीया ने आपल्या मर्यादा ओलांडून काम करायला सुरुवात केली व अनेक प्रिंट मिडियावर सरकारने प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष अनेक निर्बंध घातले आहेत. म्हणून गंभीर घटनांवर गांभीर्याने विचारच होत नाही. मात्र धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या बाबी लगेच उचलल्या जातात. आपण धर्म, जात आणि राजकारण यांच्या पलिकडे जाऊन देश व देशातील जनता यांचा विचार केला तर काय देश व देशातील जनता सुरक्षीत आहे? असा प्रश्न डोक्यात आला तर अनेक उदाहरणे डोळ्यासमोर येतात आणि मन खिन्न होते. पहिली घटना आपण बघु काश्मीर मध्ये किरण पटेल नावाचा व्यक्ती जो अनेक गुन्हामध्ये गुन्हेगार आहे. तो व्यक्ती पिएमओ ऑफिस च्या पत्रावर काश्मीर मध्ये झेड सुरक्षेमध्ये राहतो. एक दोन दिवस नाही तर तब्बल सहा महिने. झेड सुरक्षा अशी कोणालाही मिळते का? मग आरोपींना झेड दर्जाची सुरक्षा कशी मिळते यावर चर्चा व मंथन करून सखोल चौकशी करून संबधित अधिकाऱ्यांवर कार्यवाही व्हावी यासाठी मिडीया आणि जनतेने आवाज उठायला पाहिजे होता परंतु या प्रकरणावर सगळे गप्प बसले. झेड दर्जाची सुरक्षा सोडा दोन पोलीसांची सुरक्षा द्यायची असेल तर एका मोठ्या प्रक्रीयेतुन जाव लागते. मग किरण पटेल काश्मीर ला गेला कसा? कोणी पाठवले? झेड सुरक्षा मिळाली कशी? सुरक्षेची जबाबदारी कोणी घेतली? त्याला कशासाठी पाठवले? असे अनेक प्रश्न निर्माण होतात. प्रश्न व परिस्थिती गंभीर असूनही गांभीर्याने घेतली गेली नाही. दुसरे उदाहरण कुरुलकर यांचे. एका बाईच्या नादात देशाची गुप्त माहिती पाकिस्तान ला दिली गेली त्यावर फक्त एक औपचारिक बातम्या म्हणून बातम्या बनवल्या गेल्या मात्र गुप्त माहिती पाकिस्तान ला दिली याला गांभीर्याने घेतले गेले नाही. थोडे जरी काही झाले तर देशभक्ती चे नारे लावणारे लोक कुरुलकर प्रकरणात कठोर शिक्षा व्हायला पाहिजे म्हणून रस्त्यावर उतरताना दिसले नाही. एवढी गंभीर घटना असतानाही केवळ त्या घटनेकडे एक बातमी म्हणून बघितले गेले. हल्ली थोडही काही झाले तरी गुन्हेगार मुस्लिम असेल तर मोठ्याने आवाज उठवणारे मात्र पटेल आणि कुरूलकर यांच्या वेळी कुठेच दिसले नाही. याचा त्या लोकांचा संबध केवळ वाद निर्माण करण्याशी आहे. देशाशी नाही. केवळ जातीमुळे ह्या घटनांना गांभीर्याने घेतले गेले नसेल तर हि बाब देशासाठी व देशाच्या सुरक्षेतेसाठी खुप घातक आहे. जेथे सरकारच सुरक्षित नसेल, सरकारकडून च सुरक्षेचा भंग होत असेल तर सर्व सामान्य जनतेच्या सुरक्षेची जबाबदारी कोणी घ्यायची? पटेल आहे कुरुलकर यांचे गुन्हे देशद्रोहाचे आहेत. पुढे असे घडू नये म्हणून काय नियोजन आहे? यांना काय शिक्षा झाली कोणाचाही कोणाला पत्ता नाही. सरकार तर प्रत्येक बाबीमध्ये आपली जबाबदारी झटकून बाजूला होते. परंतु यामध्ये सर्व सामान्य जनता आणि देश धोक्यात येतो. तिसरे प्रकरण म्हणजे देशात अनेक महिला अत्याचाराचे प्रकरण घडलेले आहेत, आजही घडत आहेत. परंतु आरोपीची जात बघुन कँडलमार्च, आंदोलने केली जातात हीच बाब अत्याचाराला प्रोत्साहन देते असे बोलणे वावगे ठरणार नाही. आफताब प्रकरण डोक्यावर घेऊन आफताब ला शिक्षेची मागणी, आंदोलन करणारे मात्र साने प्रकरणात गप्प आहेत. आफताब ने केलेले कृत्य हे माणुसकी ला काळीमा फासणारे होतेच परंतु आफताब च्या समोर जाऊन साने ने प्रियेसीचे तुकडे कुकर मध्ये शिजवले व मिक्सर मध्ये बारीक केले विचार करा सदर कृत्य किती विदारक आहे. श्रद्धा साठी रस्त्यावर येणारे सरस्वती साठी का बर आले नसतील? सरस्वती प्रकरण गंभीर नाही? थोडक्यात काय तर केवळ जात बघुन आवाज उठवला जातो. जो पर्यंत गुन्हेगारांची जात बघुन आवाज उठवला जाईल तोपर्यंत महिलांवर अत्याचार होतच राहतील. अत्याचार थांबवायचे असल्यास गुन्हा बघुन शिक्षेची मागणी करावी तरच गुन्हेगारावर वचक बसेल. अजून एक गंभीर घटना ज्याची कुठेच जास्त चर्चा नाही. ती मध्ये नाशिक येथुन अठ्ठ्यांशी हजार कोटी बत्तीस लाख पन्नास हजार रुपये गायब झाले. सदर रक्कम छोटी आहे का? कोणी ही खिशात किंवा बँग मध्ये घेऊन जाईल? सुरक्षेचे काय? अठ्ठ्याशी हजारो कोटी जरी आपण गृहीत धरले तर पाच लाखाचे एक बंडल केले तर सतरा लाख साठ हजार बंडल तयार होतात. वरचे पैसे तर सोडून द्या. घरी दहा हजार विट आणायची तर मोठा ट्रक उभा भरून येते. मग सतरा लाख साठ हजार बंडल साठी किती गाड्या किती सुरक्षा लागली असेल? आणि एवढ्या मोठ्या सुरक्षेमध्ये पैसा गायब होईलच कसा हाच मोठा प्रश्न आहे. एवढा पैसा कोणी वळवळला? सुरक्षा यंत्रणा, सरकार काय करत होते? एवढ्या पैशाची चोरी करणे शक्यच नाही. मग हा पैसा कोणाकडे आहे? या पैशाचा वापर कशासाठी केला जातोय? ह्या किती गंभीर बाबी आहेत. याच पैशातून धार्मिक दंगली तर घडवल्या जात नाहीत ना? याचाच वापर करून निवडणूक हाय जँक तर केली जात नाही ना? अशा अनेक प्रश्नांची निर्मिती होते. सरकार जर पैसे सांभाळू शकत नाही तर सरकार ला सत्तेत राहण्याचा अधिकार आहे का? अशा प्रश्नांना उधाण येणे साहजिकच आहे परंतु या मागचे गांभीर्य बघितले तर खुप मोठा भ्रष्टाचार च नाही तर देश आणि जनता संकटात असल्याचे स्पष्ट होते. आणखी एका घटनेवर लक्ष दिले तर आपल्याला कळेल की देशात नेमकं काय सुरू आहे. केदारनाथ मंदीराला गेल्याच वर्षी २३० किलो सोन्याच्या पट्या तयार करून लावण्यात आल्या होत्या. एक वर्षही होत नाही तर सोन्याचे पितळ झाले. हा चमत्कार म्हणायचा का भ्रष्टाचार कि चोरी? रांत्रदिवस सुरक्षा, भक्ताची ये जा, पुरोहीतांची वर्दळ असलेल्या ठिकाणी सोन्याचे पितळ होते म्हणजे किती गंभीर घटना आहे. गाईवरुन देशात दंगली घडवल्या जातात. येथे चक्क देवालाच लुटले? लुटणारे बाहेरचे कि आतले? सुरक्षा व्यवस्थेचे काय? सरकारची भूमीका व जबाबदारी काय? खाण्यासाठी तांदूळ चोरणाऱ्याला बेधम मारहाण केल्याच्या घटना याच देशात घडतात. मग केदारनाथ चे तर सर्वच सोने लुटून नेले. हि बाब किती गंभीर आहे. जेथे देवाचे सोन सुरक्षित न ठेवणारे लोक त्यात देवाच्या भक्तांना कसे सुरक्षित ठेवतील हा साधा प्रश्नही डोक्यात येत नसेल तर आपण गुलाम आहोत हेच सिद्ध होते. वरिल घटनेचा विचार केला तर ह्या घटना कितीतरी गंभीर आहेत परंतु यावर प्रस्थापित मिडीया, सरकार बोलायला तयार होत नाही. इलेक्ट्रॉनिक मिडीया तर कोणाची लाचारी करते हेहि सांगायची गरज नाही. प्रत्येक ठिकाणी जात धर्म आणि हिंदु मुस्लिम वाद शोधल्यापेक्षा देशात किती गंभीर घटना घडत आहेत त्याला गांभीर्याने घेऊन सरकारला प्रश्न विचाराने आवश्यक असताना सरकारचीच बाजु मांडणारे व सदर घटनांना गांभीर्याने न घेणारे जनतेचे व देशाचे विरोधक आहेत. वरिल घटनाचा विचार केला तर लक्षात येते सत्तेसाठी लोकांना पेटवले जाते, लोकांना धर्माचे गाजर दाखवून लोकांची दिशाभूल करून लोकांनाच लुटले जाते. वरिल घटना गंभीर आहेत परंतु गांभिर्याने न घेण्याचे कारण आरोपी मुस्लिम नाहीत म्हणून कदाचित प्रकरण दाबले जात असेल. परंतु रंगावरून, नावावरून शब्दावरुन स्टेटसवरून देशात वाद होऊ शकतात त्याला चालना मिळू शकते परंतु गंभीर घटनेला गांभीर्याने घेतले जात नाही म्हणून देशात समस्या वाढत आहेत व दिवसेंदिवस भारत पिछाडीवर जात आहे. यालाही कोणी गांभीर्याने घेत नाही हिच खंत आहे.

**विनोद पंजाबराव सदावर्ते**
**समाज एकता अभियान**
**रा. आरेगांव ता मेहकर**
**मोबा: ९१३०९७९३००**

पान १ वरुन

## २३ जूननंतर पावसाची शक्यता ...

अजून पावसाची वाट पाहावी लागणार आहे.

यंदा महाराष्ट्रात पाऊस उशिराने दाखल झाला, त्यातच जूनचा पंधरवडा उलटला तरी समानाधनकारक पाऊस झालेला नाही. आता पावसासाठी पुन्हा २३ जूनची वाट पाहावी लागणार आहे. बिपरजॉय चक्रीवादळ राजस्थानच्या दिशेने पुढे सरकत आहे. २० जूनपर्यंत पश्चिम किनारपट्टीवर आणि मध्य भारतात सक्रिय परिस्थितीसह पावसाची शक्यता आहे.

सर्वसाधारणपणे जूनच्या पहिल्या आठवड्यात मान्सूनचं आगमन होतं मात्र यावर्षी मान्सूनच्या प्रवासाची गती मात्र थंडावली आहे. निम्मा जून महिना उलटून गेला तरी अद्याप मान्सून सक्रिय नसल्याने शेतकऱ्याच्या नजरा आभाळाकडे लागल्या आहेत. जून महिन्यामध्ये एकदा पावसाचा खंड झाला की संपूर्ण खरीप हंगामावर वाईट परिणाम होतो. मान्सून लांबल्याने शेतकऱ्याच्या डोक्यावर चिंतेचे काळे ढग आता अधिक गडद होऊ लागले आहेत.

## महाराष्ट्राला नवी दिल्लीत..

अंतर्गत गावात सिमेंट नाल्याचे बांधकाम, बांधामधील गाळ काढणे, पाझर तलावातील गाळ काढणे, भूमिगत प्लास्टिक बंधारा बांधणे, कृत्रिम विहीर पुनर्भरण करणे, शेततळयातील गाळ काढणे, वाळूच्या गोण्या दाबून चेकडॅम बनविणे, भूमिगत प्लास्टिक बंधारे बांधणे असे उपक्रम हाती घेण्यात आले.

यासह कमी पाण्यावर येणारी पिके जसे तुती (रेशीम उद्योग), गव्हाऐवजी कमी पाण्यावर येणारी ज्वारी, हरभरा या पिकांना प्रोत्साहन देण्यात आले. कापूस आणि मूग, सोयाबीन आणि तूर अशा आंतरपीक पद्धतींना प्रोत्साहन देण्यात आले. सोयाबीन आणि हरभरा पिकांसाठी बीबीएफचा वापर करण्यात आला. कापूस पिकात ठिंबक सिंचनाचा वापर करण्यात आला. पाणलोट क्षेत्र आधारित उपक्रम - नवीन शेततळी, शेतीचे यांत्रिकीकरण याशिवाय विविध उपक्रमांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना प्रशिक्षण देऊन त्यांच्या क्षमता वाढविण्यात आल्या. या सर्व उपाय योजनांमुळे गावातील पाणी टंचाईवर पुर्णपूणे मात करण्यात आली. हा राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाल्यामुळे कडेगावाची मोहर राष्ट्रीय पातळीवर उमटली.

सातारा जिल्ह्यातील कराड तालुक्यामधील मलकापूर या नगर परिषदेस उत्कृष्ट नागरी स्थानिक संस्था या श्रेणीत तिसरा राष्ट्रीय पुरस्कार आज केंद्रीय मंत्री श्री शेखावत यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार नगराध्यक्ष निलम येडगे आणि उपनगराध्यक्ष, पाणीपुरवठा जलनिस्सारण व आरोग्य सभापती मनोहर शिंदे यांनी स्वीकारला. हा पुरस्कार सुरत महानगर पालिकेसह विभागून देण्यात आला. मलकापूर नगरपरिषदेने वर्ष २००९ पासून 24X7 नळ पाणी पुरवठा योजना कार्यान्वित केली होती. सलग १५ वर्षे अखंडितपणे हि योजना सुरु आहे. यामुळे मलकापूर शहरातील नागरीकांना स्वच्छ पाणी पुरवठा केला जातो. २४द७ नळ पाणी पुरवठा योजनेस वर्ष २०११ चा नॅशनल अर्बन वॉटर वार्ड व पंतप्रधान पुरस्कारानेही सन्मानित करण्यात आले आहे.

ही योजना देशभरातील इतर स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी पथदर्शी प्रकल्प ठरली आहे. २४ तास पाणी मीटरव्दारे देण्यात येते. यामध्ये जे स्थानिक नागरीक दर महिण्याच्या १५ तारखेच्या आत पाणी पट्टी कर भरतात त्यांना १० टक्के सवलत दिली जात असल्याने ९० टक्के लोग पाणी पट्टी कर भरतात, अशी माहिती उपनगराध्यक्ष श्री शिंदे यांनी दिली.

24X7 नळ पाणी पुरवठा योजनेसाठी कोयना नदीच्या पात्रातून जॅकवेल मधून रॉ-वॉटर घेऊन त्याच्यावर 24X7 फिल्टर प्लांटद्वारे आधुनिक तंत्रज्ञानाने प्रक्रिया केली जाते. डी आय व एचडीपीई बंद नलिकेद्वारे एएमआर मीटरचा वापर करुन संपुर्ण शहराला पाणी पुरवठा केला जातो. मलकापूर नगरपरिषद 24X7 नळ पाणी पुरवठा योजने बरोबरच मलकापूर नगरपरिषदेने सांडपाणी प्रक्रिया योजना राबविली आहे. या अंतर्गत पाण्याचा पुर्नवापर अतिशय नियोजनबद्दरित्या केला जात आहे. हे पुर्नवापर केलेले पाणी शेतीसाठी वापरण्यात येत आहे.मलकापूर नगर परिषदेच्या एकूण कार्याचा गौरव आज राजधानी दिल्लीत करण्यात आला.

स्वयंसेवी सामाजिक संस्था या श्रेणीत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या पुणे येथील 'भारतीय जैन संघटनेस' (बीजेएस) तिसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार केंद्रीय मंत्री श्री शेखावत यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. संस्थेचे प्रमुख शांतीलाल मुथा आणि सहायक संचालक स्वप्ना पाटील यांनी हा पुरस्कार स्वीकारला. बीजेएस ही संस्था मागील ३७ वर्षांपासून जलस्त्रोत विकास, मुल्य आधारित शालेय शिक्षण, आपत्ती प्रतिसाद व व्यवस्थापन या विषयांवर अविरत काम करीत आहे. २०१३ पासून जल संधारणावर सातत्याने संस्थेचे कार्य सुरू आहे. महाराष्ट्रातील २४ जिल्ह्यांमध्ये पाण्याचे व्यवस्थापन, जलाशयांचे व तलावांचे पुनरुज्जीवन, त्यातून निघणारी माती शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यात येत असल्यामुळे नापीक झालेली जमीन सुपीक होत आहे. प्रकल्पाच्या एकूण खर्चापैकी साधारण ६५% खर्च हा गाळ शेतात नेऊन टाकण्याचा असतो तो शेतकरी स्वत: उचलतात, हे विशेष. राज्यातील बुलढाणा जिल्ह्याला जलपर्याप्त करण्याचे महत्त्वाचे नियोजन कार्य बीजेएस संस्थेच्या माध्यमातून झालेले आहे. आता संस्था राज्य सरकारची 'गाळ-मुक्त धरण व गाळयुक्त शिवार' योजना प्रभावीपणे राबवण्यात सरकारी यंत्रणेला संपूर्ण सहकार्य करत आहे.

## भारताला आता ऊर्जेचा आयातदार

विद्यार्थ्यांना दिल्या. नवीन तंत्रज्ञान, आर्थिक शाश्वती, कच्च्या मालाची उपलब्धता आणि नवीन बाजारपेठांची निर्मिती हे भांडवली गुंतवणुकीसाठी आवश्यक असून याच्या निर्मितीसाठी युवकांनी पुढाकार घावा. त्याचप्रमाणे पाणी, ऊर्जा, बांधकाम, तंत्रज्ञान हे रोजगार निर्मितीसाठी महत्त्वाचे असे घटक आहेत त्यांचे सशक्तीकरण होणे आवश्यक असल्याचे गडकरी म्हणाले. भारताला आता ऊर्जेचा आयातदार होण्यापेक्षा ऊर्जेचा निर्यातदार होणे अत्यंत गरजेचे आहे. यासाठी प्रत्येक गोष्टीचे लेखापरीक्षण होणे आवश्यक आहे. यासाठी मानवी लेखापरीक्षण, कार्यशैलीच लेखापरीक्षण, गुणवत्तेचे लेखापरीक्षण ,व्यवसायाचे लेखापरीक्षण होणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

## अनिल जयसिंघानीला ईडीचा

प्रकरणामध्ये गुंतलेल्या संस्थेशी संबंधित व्यक्तींच्या मदतीने फसवणुकीच्या माध्यमातून त्याने मोठ्या प्रमाणात पैसे जमा केल्याचंही तपासात उघड झालं आहे.

अनिल जयसिंघानी २०१५ पासून ईडीचे समन्स टाळत आहे. २०१५ मध्ये विशेष पीएमएलए कोर्टाने त्याच्याविरुद्ध अजामीनपात्र वॉरंट जारी करूनही तो झचङ- तपासात सहकार्य करत नाहीय. त्याला ८ एप्रिल २०२३ रोजी ईडीने अटक केली होती आणि त्यानंतर अहमदाबादमधील पीएमएलए कोर्टाने त्याचा जामीन अर्ज फेटाळला होता.

ईडीने ९ जून रोजी जयसिंघानीच्या ओळखी असलेल्या परिसरात छापा टाकला. ईडीने आता जयसिंघानीची ३.४० कोटी किमतीची स्थावर मालमत्ता जप्त केली आहे, ही जयसिंघानी यांच्या नावावर नोंदणीकृत आहे. याव्यतिरिक्त, ईडीने ६ जून रोजी अहमदाबाद येथील विशेष पीएमएलए न्यायालयासमोर आरोपी जयसिंघानीविरुद्ध फिर्यादी तक्रार दाखल केली.

## आंतरराष्ट्रीय योगदिनी विधानभवनाच्या

आंतरराष्ट्रीय योग दिवस म्हणून साजरा करण्यात येणे ही सर्व भारतीयांसाठी अभिमानास्पद अशी घटना आहे. भारताचे पंतप्रधान माननीय श्री. नरेंद्र मोदीजी यांच्या संकल्पनेनुसार जगातील सर्वच देशांमध्ये या दिवशी सामूहिक योगासनांचे कार्यक्रम आयोजित केले जातात आणि आरोग्यसंपन्न जीवनशैलीसाठी योगाचे महत्व अधोरेखित केले जाते. याच पार्श्वभूमीवर हा कार्यक्रम यंदा विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आल्याचे माननीय विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर यांनी स्पष्ट केले. अधिकाधिक सन्माननीय सदस्यांनी या उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहनही त्यांनी केले आहे. योगप्रसार कार्यात उल्लेखनीय योगदान देत असलेल्या शतकमहोत्सवी कैवल्यधाम, मुंबई या संस्थेचा विशेष सहभाग या उपक्रमासाठी लाभला आहे.

## बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री

सर्वच बांधवानां एकत्र घेऊन पुढे जायचे आहे.

उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, दरवर्षीप्रमाणेच गृह विभाग या सणासाठी नियोजन करेल, आवश्यक ती दक्षता घेईल. या सणापूर्वी तीन-चार दिवस आधी पशूंची वाहतूक सुरु होते. त्यामध्ये काही अनधिकृत घटक अडथळा आणत असतील तर त्याबाबत पोलीस दक्षता घेतील.

यापुर्वी देखील आपण या सणासाठी उत्तम नियोजन केले आहे. त्याहून अधिक प्रभावी आणि चांगली अशी अंमलबजावणी यंदा होईल, याकडे लक्ष दिले जाईल.

यावेळी मुस्लिम बांधवाच्या वतीने श्री. सिद्दीकी यांनी यंदा ईद व एकादशी एकाच दिवशी आल्याचे सांगून. मुस्लिम बांधवांनी अशा प्रकारे एकाच दिवशी आलेल्या अनेक सणांच्या पावित्र्याचा नेहमीच आदर केल्याचे सांगितले.

आमदार श्री. आझमी, आमदार श्री. शेख यांनी बाजार समित्यांबाहेर बकरी विक्रीस परवानगी दिल्याबद्दल व पशूवैद्यकीय तपासणी शुल्क पूर्वीप्रमाणेच आकारणी करण्याचे निर्देश दिल्याबद्दल आभार मानले.

# 'मिशन भगीरथ प्रयास' उपक्रमामुळे जलस्त्रोत संवर्धनास लाभ

### केंद्रीय नोडल अधिकारी राय महिमापत रे



नाशिक : मिशन भगीरथ प्रयास या उपक्रमामुळे जिल्ह्यातील जलस्त्रोतांचे संवर्धन होण्यास निश्चितच मदत होणार आहे. त्या अनुषंगाने हा उपक्रम भविष्यात सातत्याने राबविण्यासाठी नियोजन करण्यात यावे, असे प्रतिपादन जलशक्ती अभियानचे केंद्रीय नोडल अधिकारी राय महिमापत रे यांनी केले आहे. आज जिल्हाधिकारी कार्यालयातील मध्यवर्ती सभागृहात जलशक्ती अभियानाच्या अंतर्गत झालेल्या कामांची पाहणी करून आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीस जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल, निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र वाघ, जिल्हा जलसंधारण अधिकारी हरिभाऊ गिते, उपवनसंरक्षक उमेश वावरे, केंद्रीय जलशक्ती अभियानाचे तांत्रिक अधिकारी पंकज बक्षे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र परदेशी यांच्यासह संबंधित विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. केंद्रीय नोडल अधिकारी राय महिमापत रे म्हणाले, जल जीवन मिशन अंतर्गत ग्रामीण पातळीवर करण्यात आलेली कामे समाधानकारक असून या कामांची शहरी भागात व्याप्ती वाढविण्यात यावी. तसेच जिल्हा परिषदे मार्फत राबविण्यात येणारे मिशन भगीरथ प्रयास या उपक्रमातील पहिल्या वर्षातील झालेली कामे अतिशय उत्कृष्ट आहेत. या कामांचे सातत्य टिकवण्यासाठी मिशन भगीरथ प्रयास उपक्रम अजून पुढील काही वर्ष सुरू राहणे आवश्यक आहे. त्यासाठी या उपक्रमाचा सविस्तर प्रस्ताव तयार करून केंद्र शासनास सादर करावा, असेही केंद्रीय नोडल अधिकारी महिमापत रे यांनी यावेळी सांगितले.

केंद्रीय पथकामार्फत दोन दिवसीय दौऱ्यात जलशक्ती अभियानांतर्गत जिल्ह्यातील नाशिक, पेठ व येवला तालुक्यात झालेल्या कामांची पाहणी करण्यात आली. यावेळी पेठ तालुक्यातील आसारबारी येथील प्राथमिक शाळा तसेच अमृत सरोवर योजनेंतर्गत तयार केलेल्या पाझर तलावाची पाहणी केली. त्याचप्रमाणे कोपूर्ली येथे अमृत सरोवर योजनेंतर्गत केलेले नाला रुंदीकरणाचे काम, मौजे जोगमोडी, आमडोंगरा व आंबे यागावांत सुरू असलेल्या कामांनाही केंद्रीय पथकाने भेट दिली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinewsgmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

निगडी येथे महात्मा बसवेश्वरांच्या पुतळ्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याहस्ते अनावरण

# महात्मा बसवेश्वरांनी १२ व्या शतकात संसदीय लोकशाही प्रणालीचा पाया घातला : मुख्यमंत्री



पुणे : महात्मा बसवेश्वर यांनी १२ व्या शतकातच 'अनुभवमंटप' च्या माध्यमातून संसदीय लोकशाही प्रणालीचा पाया घातला. जातीभेदाच्या भिंती तोडून टाकण्यासाठी त्यांनी स्वत:पासून सुरुवात केली, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज केले.निगडी येथे उभारण्यात आलेल्या महात्मा बसवेश्वर यांच्या पुतळयाच्या अनावरणप्रसंगी मुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते. याप्रसंगी खासदार श्रीरंग बारणे, आमदार उमा खापरे, महेश लांडगे, अश्विनी जगताप, अण्णा बनसोडे, माजी राज्यमंत्री बाळा भेगडे, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आयुक्त राहुल महिवाल, पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे आदी उपस्थित होते.मुख्यमंत्री म्हणाले, बसवेश्वरांनी समाजाप्रती आस्था, बांधिलकी दाखवून दिली. इंग्लंडमधील मॅग्नाकार्टा या संसदीय प्रणालीच्या आधीच त्यांनी 'अनुभव मंटप'च्या माध्यमातून लोकशाही प्रणालीची व्यवस्था निर्माण केली. स्त्री-पुरुष, धर्म, जात- पात, पंथ भेदाच्या पलिकडे जाऊन कोणीही 'अनुभवमंटप' मध्ये आपले अनुभव मांडू शकत होते. श्रम हीच पूजा आणि श्रमाधारित व्यवस्था इतके साधे सोपे तत्त्वज्ञान महात्मा बसवेश्वरांनी सरळ सोप्या भाषेत मांडले. देवाशी म्हणजे शिवाशी जोडण्यासाठी मध्यस्थाची गरज नाही अशी मांडणी त्यांनी केली. त्यांच्या तत्वज्ञानाची जगभरातील विद्यापीठांनी दखल घेतली. महात्मा बसवेशवर यांनी खऱ्या अर्थाने समता, बंधुता या तत्त्वांचा पुरस्कार केला. महापुरुषांचे समाजासाठी योगदान मोठे आहे. त्यांच्या विचारांवर चालत सामाजिक बांधिलकी जपण्याचे काम आपण करत असतो. महात्मा बसवेश्वरांनी समता, बंधुतेच्या तत्त्वांसाठी कोणतीही तडजोड केली नाही.

महात्मा बसवेश्वर यांचा पुतळा हे प्रेरणास्थळ, उर्जास्थळ आहे. महात्मा बसवेश्वरांचा लंडन येथेही पुतळा उभारण्यात आला आहे. हे महापुरुष आपल्याला आदर्श देऊन गेले आहेत. निगडी येथील हा पुतळा लोकवर्गणी लोकसहभागातून केला याला जास्त महत्त्व आहे. त्यांचा त्याग, आदर्श डोळ्यासमोर ठेऊन आपण हे मोठे काम केले आहे, असे श्री.शिंदे म्हणाले. यापुढेही पुतळा परिसर सुशोभिकरण संबंधित आवश्यक कामासाठी पैसे कमी पडणार नाहीत. या परिसरातील दफन भूमीचा प्रश्नही सोडविण्यात येईल, अशी ग्वाहीही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी दिली.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, हे वर्ष छत्रपती शिवाजी महाराजांचे ३५० व्या राज्याभिषेक सोहळ्याचे वर्ष आहे. हीदेखील आपल्यासाठी अभिमानाची बाब आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचा आदर्श डोळ्यापुढे ठेऊन शासन काम करत आहे. गेल्या वर्षभरात राज्य शासनाने अनेक लोकोपयोगी निर्णय घेतले. लोकांच्या जीवनामध्ये अनेक बदल घडविण्यासाठी अनेक नियम बदलले, असेही ते म्हणाले.प्रास्ताविकात आयुक्त शेखर सिंह यांनी पुतळा उभारणीमागची संकल्पना स्पष्ट केली. समतावादी मूल्ये रुजविण्यासाठी महात्मा बसेवश्वरांनी उभे आयुष्य प्रयत्न केले. त्यांनी न्याय, बंधूता आणि एकतेची शिकवण दिली. समाजातील सर्व घटकांना एकत्र आणण्याचे कार्य त्यांनी केले. त्यांचे विचार मानवी जीवनाला प्रगत करणारे त्यांचे विचार होते. महापुरुषांच्या अशा विचारांमुळे नव्या पिढीला दिशा मिळते असे त्यांनी सांगितले.

यावेळी नारायणराव भैरवडे यांनीही विचार व्यक्त केले. पिंपरी चिंचवड महापालिकेच्यावतीने निगडी प्राधिकरण येथे श्री महात्मा बसवेश्वर महाराज यांचा पुतळा उभारण्यात आला आहे. सुमारे ३ हजार १५० चौरस मीटर क्षेत्र परिसरात पुतळयाची उभारणी करण्यात आली आहे. या पुतळ्यासमोरील जागेचे सुशोभीकरण करण्यात आले आहे. पुतळ्याभोवती २२५ मीटर लांबीची सीमाभिंत बांधण्यात आली आहे.

## स्वामी भक्त मंत्रमुग्ध होत असून, स्वच्छ, सुंदर, हरित, वसुंधरेची जपणूक : आशिष लोकरे



अक्कलकोट/प्रतिनिधीः श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली सुरु असलेल्या सेवेने स्वामी भक्त मंत्रमुग्ध होत असून, स्वच्छ, सुंदर, हरित, वसुंधरेची जपणूक करणारे मंडळ आहे. न्यासाच्या विकासभिमुक कामासाठी नेहमीच माझे सहकार्य राहील असे मनोगत आशिष लोकरे जिल्हा प्रशासन अधिकारी नगरपालिका प्रशासन (डी.पी.ओ.) सोलापूर जिल्हा यांनी व्यक्त केले. ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळा आले असता न्यासाचे सचिव शामराव काका मोरे यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. या वेळी ते बोलत होते. त्यांच्या समवेत अक्कलकोट नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सचिन पाटील, न.प. आरेखक, मलिक बागवान, विठ्ठलराव तेली उपस्थित होते. यावेळी, न्यासाचे पुरोहित संजय कुलकर्णी, सौरभ मोरे, आप्पा हंचाटे, बाबुशा महिंद्रकर, अमित थोरात, एस.के. स्वामी, शावरेप्पा माणकोजी, सिद्धाराम कल्याणी, विनायक तोडकर, महादेव अनगले, धनप्पा उमदी, मल्लिकार्जुन बिराजदार, सतीश महिंद्रकर, शहाजीबापू यादव, नामा भोसले, बाळासाहेब घाडगे, श्रीनिवास गवंडी, प्रसन्ना बिराजदार, दत्ता माने, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, रमेश हेगडे, महांतेश स्वामी, धनंजय निंबाळकर, अनिल बिराजदार, मल्लिनाथ कोगनुरे, लाला निंबाळकर, कल्याण देशमुख यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

## पंचायत समिती कार्याच्या मूल्यमापनास स्वामी समर्थांचे आशिर्वादही तितकेच मोलाचे : गटविकास अधिकारी सचिन खुडे



अक्कलकोट/प्रतिनिधीः महाराष्ट्र शासनाच्या यशवंत पंचायतराज अभियानांतर्गत ग्रामीण विकास योजना अंमलबजावणी मध्ये अक्कलकोट पंचायत समिती पुणे विभागात अव्वल ठरली आहे. सन २००५-०६ पासून महाराष्ट्र शासनाने जिल्हा परिषद व पंचायत समितीसाठी राज्यस्तर व विभाग स्तरावर पंचायतराज अधिकारी पुरस्कार योजना सुरू केली आहे. या अभियानाच्या अनुषंगाने शाश्वत विकास ध्येय अंतर्गत १७ उद्दिष्ट ९ संकल्पनांना सर्व विभागाचे कामकाजा संदर्भात अक्कलकोट पंचायत समितीला प्रश्नावली दिली गेली. ती यामध्ये केलेल्या कामाच्या प्रथम विभागीय समितीद्वारे अक्कलकोट कार्यालयाची तपासणी करून अक्कलकोट कार्यालयाचे मूल्यमापन केले. या माध्यमातून पंचायतराज समिती या अंतर्गत अक्कलकोट पंचायत समिती पुणे विभागात अव्वल ठरलेली आहे. या कार्यास स्वामी समर्थांचे आशीर्वाद ही तितकेच मोलाचे ठरलेले आहेत. असे प्रतिपादन येथील पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सचिन खुडे यांनी केले. ते नुकतेच अक्कलकोट पंचायत समितीस अव्वल पुरस्कार लाभल्यानंतर येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन समर्थांचे आशीर्वाद घेतले. याप्रसंगी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांचे सुपुत्र प्रथमेश इंगळे यांनी गटविकास अधिकारी सचिन खुडे यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन सन्मान केला. यावेळी बोलताना खुडे आपल्या भावना व्यक्त केल्या. याप्रसंगी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, प्रसाद सोनार, गिरीश पवार, लखन गवळी, श्रीकांत मलवे, रवी मलवे इत्यादी उपस्थित होते.

## चिमणी पडली पण यापुढे किती विमाने उडणार आहेत हेच आम्हाला बघायचे आहे : विभाग प्रमुख उमेश साळुंखे



सोलापूर/प्रतिनिधीः चिमणी पाडून सोलापूर जिल्ह्यातील कष्टकरी शेतकरी मजूर कामगार यांची घरे उध्वस्त केले आहेत यापुढे सोलापूर मधून किती विमाने उडणार आहेत हेच आम्हाला बघायचे आहे, असा इशारा उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे वागदरी विभाग प्रमुख उमेश साळुंखे यांनी दिला आहे. चिमणी पाडून सोलापूर जिल्ह्यातील कष्टकरी शेतकरी मजूर कामगार यांची घरे उध्वस्त करण्यात आली आहेत,

भाजपचे लोक सोलापूर जिल्ह्यातील उद्योग दुसरीकडे जाण्यासाठी अगोदर चे उद्योग बंद पाडत आहेत असा आरोप बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे वागदरी विभाग प्रमुख उमेश साळुंखे यांनी केला आहे. श्री सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्या ची चिमणी पाडून सोलापूर च्या विकास थांबवण्यासाठी डाव खेळला जात आहे असेही साळुंखे यांनी म्हटले आहे


महाराष्ट्र राज्यातील आत्ताच्या सत्ताधाऱ्यांनी सोलापूर जिल्ह्यात एकही मोठा उद्योग आणलेला नाही हे मोठे अपयश आहे, भूसंपादन झालेल्या बोरामणी विमानतळाचा विकास साधला असता तर सिध्देश्वरची चिमणी पाडण्याचा प्रश्नच उदभवला नसता. आणि शेतकर्यांसाठी पवित्र मंदिर म्हणून मोठ्या दिमाखात उभी असलेल्या या कारखान्याची चिमणी पाडण्याची दुर्दैवी वेळ आली नसती. असेही विभाग प्रमुख उमेश साळुंखे यांनी म्हटले आहे,

सिध्देश्वर साखर कारखान्याची चिमणी पाडून प्रशासनाने सोलापूरचे एक प्रकारे मोठे नुकसान केलेले आहे.

हजारो सभासद असलेले शेतकरी आणि शेकडो कामगारची गुजराण या कारखान्यावर अवलंबून होती या सर्वांना त्यांनी देशोधडीला लावले आहेत, . या साऱ्यांना सत्ताधाऱ्यांनी पराभुत केले आहेत, आणि आपला स्वार्थी हेतु साध्य करुन घेतला आहे. वास्तविक पाहता सोलापूरात कोणताही मोठा उद्योग नाही की कारखानदारीही नाही, तरुणांच्या हाताला काम नाही, काम नसलेल्या हातांची संख्या दिवसेंदिवस वाढू लागलेली आहे, तरुण गुंडगिरी आणि व्यासनाधीनतेकडे वळू लागलेले आहेत. अशा परिस्थितीत चालू कारखान्याची चिमणी पाडून राजकारण खेळले गेले आहे चिमणी पाडून शेतकरी कष्टकरी मजूर कामगार यांच्या चुली बंद पाडल्या आहेत याचा बदला आम्ही जरूर घेऊ असेही साळुंखे म्हणाले.

सोलापूर महानगरपालिका प्रशासनाने पुढील तारीख असूनही अगोदरच ही चिमणी पाडण्याचा घाट घातला? कुणाच्या सांगण्यावरून त्यांनी घाई गडबडीत ही चिमणी पाडली, सोलापूर मध्ये आता किती विमाने येणार हेच आम्ही बघणार आहोत असा इशारा देऊन साळुंखे पुढे म्हणाले की, चिमणी पाडल्याच्या या घटनेचा आम्ही बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या वतीने निषेध करतो, भविष्यात होटगी रोडच्या विमानतळावरून मोठे विमाने येऊ शकतील इतकेही मोठे हे विमानतळ नाही. भविष्यात याचा किती फायदा होणार आहे. या सर्व गोष्टीचा विचार करून बोरामणी विमानतळाचा विकास करणे अपेक्षित असताना शेतकर्यांच्या मंदिराचा कळस म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सिद्धेश्वर चिमणी पाडण्याचा घाट प्रशासन आणि राजकारण्यांनी घातला, हे जनतेच्या आणि विकासाच्या दृष्टीने अंत्यत घातक आणि धोकादायक व नुकसान कारक ठरले आहे.


## शब्दकोडे क्र ३२



आडवे शब्द १. वस्त्र ३. त्याप्रमाणे ५. अशा माणसाकडे काहीही काम सोपवू नये ११. निश्चय १२. डोळ्याच्या उघड्या पृष्ठभागावरील पारदर्शक आवरण १४. पुन्हा १५. कधीही पोळे न सोडणारी १६. मुक्काम १८. ओसाड, वैराण १९. पौर्णिमा २०. लेखणीचा आधुनिक प्रकार २१. वेल २३. साडीच्या खालच्या भागाला लावलेली अस्तराची किनार २४. बाव, झावळीच्या पातीमधील काडी २५. सूर्यास्ताआधी २७. लक्ष - पण भान नाही २९. तोरा ३२. आवरण ३५. पदवी ३६. सूट ३७. सर्वात लहान ३९. सर्वात मिळून, सर्वांचे ४०. अपुरा ४२. रोटीचा प्रकार ४३. गोष्ट ४४. तीव्र लोभ ४५. सत्तेवर आलेला ४८. आर्जवे ५०. भित्रा ५२. डुक्कर ५४. दुधी भोपळ्याचा गोड पदार्थ ५६. चांदी ५८. सैनिक ६०. सुळका ६१. पृथ्वी ६३. व्यायामप्रकार, अवघड कामगिरी ६४. शहाणपण यावर अवलंबून नसते ६६. लिंबाची निरूपयोगी जात ६७. एकाच वेळी, अचानक ६९. अंत:करण ७१. शेवट ७३. जोग धबधबा या नदीवर (कर्नाटक) आहे ७४. सहजगत्या ७६. वेग ७९. हक्क सांगणे ८१. प्रमाद ८३. लहान मुलाची तुमान ८४. गुंड ८५. टेंभा ८७. बंदुकीने केलेला हल्ला ९१. चोप ९३. इंद्राची पत्नी ९४. सावध ९७. स्वच्छ ९८. ऋण ९९. अंदाज १००. एक शेंगभाजी १०२. गंध, परिमल १०४. टिंगल १०५. राजस्थानी स्त्रियांच्या पेहरावातील नक्षीचा घोळदार परकर १०६. घाणेरडे १०७. टोकदार १०८. श्रम १०९. ऋषी

उभे शब्द १. स्थापनादिवस २. हा प्राणी स्वत:चा रंग बदलू शकतो ३. पोहण्यासाठी बांधलेला तलाव ४. सर्प ५. शंकराचे प्रिय फळ ६. पूर्वज ७. माळजमीन ८. दंत ९. 'अपराध मीच केला, शिक्षा तुझ्या कपाळी.....' १०. विलंब, दिरंगाई १३. डोक्याचा केस गळून गेलेला भाग १५. जंगल १७. दूरचा फेरा ह्न बहुदा उगाच पडणारा १९. रोमांच २२. लकेर २६. विधानातील स्पष्ट विसंगती २८. आजीच्या जमान्यातील बिनविजेचा मिक्सर-ग्राईंडर! ३०. परिमार्जन ३१. अतिशय हानिकारक ३३. व्रत ३४. कमळ, मुलाचे एक नाव ३५. सज्जन ३६. डोंगराच्या माथ्यावरील सपाट जमीन ३८. राजवाडा ४१. कौशल्य ४२. स्त्री ४५. प्रारब्धदेवता ४६. प्रवाह ४७. तुरूंग ४८. कुरळे केस ४९. अभिमानास्पद ५१. फुलातील पराग ५२. साबुदाण्याचा तळीव पदार्थ ५३. आक्षेप ५५. श्रीकृष्णाच्या जीवावर उठलेली मावशी ५७. युद्धातील यश ५९. गुडघ्यापासून घोट्यापर्यंतचे हाड ६०. मान्य ६२. हाक ६५. कलिका ६८. चिलट ६९. तनू ७०. सर्वांना ठाऊक झालेले ७२. जर, जेव्हा ७५. स्थूल ७७. किनारा ७८. किरकोळ, फालतू ८०. डावा ८१. शेगडी ८२. ताकद ८६. विज्ञान ८७. अडचण ८८. बडबडगीतांची शाळा ८९. मृदंग ९०. शर्विलक ९१. मत्स्य ९२. स्वातंत्र्य ९३. साखर ९५. सार्वजनिक वाहतुकीचे अवजड वाहन ९६. मोठी सुई ९९. सुदृढ, मजबूत १००. निवृत्तीनाथांचे गुरु, नऊ नाथांपैकी एक १०१. कुमक १०३. पूर्व दिशा

## आम्हा पाटील कुटुंबियांचे श्रद्धेचे ठिकाण : शांतादेवी पाटील




अक्कलकोट/प्रतिनिधीः श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले

यांच्या नेतृत्वाखाली सुरु असलेली भक्त सेवा उल्लेखनीय असून, आम्हा पाटील कुटुंबियांचे श्रद्धेचे ठिकाण असल्याचे मनोगत माजी मंत्री, आमदार सत्येजीत तथा बंटी पाटील यांच्या मातोश्री शांतादेवी ज्ञानदेव पाटील कोल्हापूर यांनी व्यक्त केले. ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात आले असता न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. या वेळी ते बोलत होते. यावेळी, न्यासाचे पुरोहित संजय कुलकर्णी, सौरभ मोरे, आप्पा हंचाटे, बाबुशा महिंद्रकर, अमित थोरात, एस.के. स्वामी, शावरेप्पा माणकोजी, सिद्धाराम कल्याणी, विनायक तोडकर, महादेव अनगले, धनप्पा उमदी, मल्लिकार्जुन बिराजदार,सतीश महिंद्रकर, शहाजीबापू यादव, नामा भोसले, बाळासाहेब घाडगे, श्रीनिवास गवंडी, प्रसन्ना बिराजदार, दत्ता माने, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, रमेश हेगडे, महांतेश स्वामी, धनंजय निंबाळकर, अनिल बिराजदार, मल्लिनाथ कोगनुरे, लाला निंबाळकर, कल्याण देशमुख यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, उपस्थित होते.

# सन्मान निधी योजनेच्या कार्यपध्दतीमध्ये सुधारणा

सोलापूर/प्रतिनिधी : प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेंतर्गत मिळणाऱ्या लाभापासून कोणताही पात्र लाभार्थी वंचित राहू नये व योजनेची सुरळीतपणे अंमलबजावणी होण्यासाठी योजनेच्या कार्यपध्दतीमध्ये सुधारणा करण्यात आल्या असून, याबाबतचा शासन निर्णय १५ जून रोजी निर्गमित करण्यात आला आहे. या शासन निर्णयामध्ये अर्जदार व संबंधित कृषी, महसूल व ग्रामविकास विभागाने पार पाडावयाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या आहेत. तसेच पीएम किसान पोर्टलवर नोंदणी करणे व पात्र लाभार्थ्यांना मान्यता प्रदान करण्याबाबतची कार्यपध्दती स्पष्ट करण्यात आली आहे. योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी संनियंत्रण समित्या स्थापन करून या समित्यांचे कार्य व जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे.

# जून २०२४ पर्यंत धाराशिवला क्रष्णाखोरेचे पाणी मिळणार : धाराशिवचा कायापालट करणार

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे धाराशिवकराणा आश्वासन




वागदरी/एस.के.गायकवाड :गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या धाराशिवच्या २१ टीएमसी पाण्याचा प्रश्न मार्गी लावला असून येत्या जून २०२४ पर्यंत धाराशिवला क्रष्णाखोरेचे हक्काचे पाणी मिळणार असून भविष्यात धाराशिवचा कायापालट करणार असे आत्मविश्वास पूर्वक आश्वासन राज्याचे उपमुख्यमंत्री नामदार देवेंद्र फडणवीस यांनी धाराशिव येते आयोजित भाजपच्या महा जनसंपर्क आभियान सभेत बोलताना केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नऊ वर्षाच्या कार्यकाळात त्यांनी केलेली विकास कामे जनतेपर्यंत पोहंचविण्यासाठी भाजपच्या वतीने लोकसभा महा जनसंपर्क आभियान राबविण्यात येत आहे. या निमित्ताने धाराशिव येथील मल्टीपर्पज हायस्कूलच्या मैदानात भाजपच्या महासभेचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रसंगी प्रमुखमार्गदर्शक म्हणून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले की देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अनेक जनकल्याण योजना जाहीर केलेल्या असून कोट्यावधी लोकांना कोरोनाची प्रतिबंधात्मक लस मोफत देवून जनतेच्या आरोग्यची काळजी घेतली आहे.एवढेच नव्हे तर परदेशाला कोरोना प्रतिबंधात्मक लस पुरवठा करून भारत देशाचे नाव लौकिक केले आहे.महाराष्ट्रालाही भरीव आशा योजना दिल्या आहेत. सोलापूर-तुळजापूर ते धाराशिव रेल्वे लवकरच सुरू करण्यात येणार आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या क्रष्णाखोऱ्याचं मराठवाडाच्या हक्काचे २१ टीएमसी पाणी देण्यासाठी शासनाने जवळपास ११ हजार कोटी मंजूर केले असून येत्या जून २०२४ पर्यंत हे पाणी धाराशिवला मिळणार आहे. महात्मा फुले जन आरोग्य योजने अंतर्गत मोफत उपचार, नमोशेतकरी महासन्मान योजने अंतर्गत शेतकऱ्यांना १२००० रू.दरवर्षी पेनशन देण्यात येणार आहे तर १ रुपयात पिकविमा भरून घेतला जणार आहे.शेतकऱ्यांना अखंडीत वीजपुरवठा करण्यासाठी सौर ऊर्जा प्रकल्प राबविण्यात येणार आहे.पंतप्रधान आवास घरकुल योजनेतून मोफत घरकुल देण्यात येते आहे. धाराशिव येते मेडिकल काँलेज सुरू करण्यात येत आहे.

व्रध्दाना मोफत तर महिलांना पन्नास टक्के दरात एस.टी.बससेवा सुरू करण्यात आली आहे. असाप्रकारे केंद्र आणि राज्य सरकार कडून अनेक विविध जनकल्याण योजना देशात आणि राज्यात राबविण्यात येत आहेत.असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. प्रारंभी महाराष्ट्राचे कुलदैवत आई तुळजाभवानी मातेच्या प्रतिमेचे पूजन करून आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते चांदीची गढा देवून देवेंद्र फडणवीस यांचे स्वागत करण्यात आले.

सभेचे प्रास्ताविक आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केले तर सुत्रसंचलन संजय मैंदरगीकर यानी केले.यावेळी व्यासपीठावर सहकार मंत्री नामदार अतुल सावे,भाजपा नेते प्रविण दरेकर, आ.सुरेश दस,आ.आभिमन्यु पवार,आ.संभाजी पाटील निलंगेकर,आ.रमेश कराड,आ.राजेंद्र राऊत, माजी आमदार सुरजितसिंह ठाकूर, जिल्हा अध्यक्ष नितीन काळे,उपस्थित होते. याप्रसंगी उस्मानाबाद लोकसभा मतदारसंघातील कार्यकर्ते, महिला, युवक नागरिक हजारोच्या संख्येने या सभेत सहभागी झाले होते.

# लघुपटाव्दारे शिक्षणाच्या अधिकाराचे महत्व, न्यायाधीश एम. बी.लंबे यांचा अनोखा उपक्रम

पंढरपूर/प्रतिनिधीः किमान समान शिबीरा अंतर्गत पंढरपूर तालुका विधी सेवा समितीच्यावतीने किमान समान शिबीरा अंतर्गत आज शनिवार, दिनांक १७ जुन, २०२३ रोजी अरिहंत पब्लिक स्कूल, पंढरपूर येथे जिल्हा न्यायाधीश एम. बी. लंबे यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यायाधीश एन. एस. बुद्रुक यांच्या अध्यक्षतेखाली कायदेविषयक शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांना लघुपटाव्दारे शिक्षणाच्या अधिकाराचे महत्व समजावण्यात आले.सदर शिबीरामध्ये मुलींच्या शिक्षणाच्या अधिकाराबद्दल महत्व सांगणारा व अमित काटकर दिग्दर्शन केलेला खिडकी हा लघुपट दाखवण्यात आला. या लघुपटामध्ये गरीब घरातील मुलींना शिक्षण घेणेसाठी कोण कोणत्या समस्यांनातोंडद्यावे लागते व त्यावर कशी मात करता येते याबद्दल अतिशय चांगल्या प्रकारे संदेश देण्यात आला आहे. सदर लघुपटास दादासाहेब फाळके आंतराष्ट्रीय फिल्म फेस्टीव्हल २०२३ मध्ये १५ वे स्थान मिळाले होते. या लघुपटास अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. लघुपटामध्ये विधीज्ञ पल्लवी कांते, जुलेखा मुटवली, दिपक कांबळे व त्यांचे सहकारी यांनी काम पाहिले आहे. यावेळी न्यायाधीश एन. एस. बुद्रुक यांनी सदर लघुपटामधुन नेमका कोणता संदेश आहे त्याबद्दल विस्तुत माहिती दिली. तसेच मुलींना शिक्षित केल्याने शिक्षणाच्या प्रत्येक दृष्टीकोनातून मुलींचे कौशल्य आणि अनुभव सुधारण्याचा प्रयत्न होतो. मुलींना शाळेत असताना सुरक्षित वाटेल आणि शिकावे, नोकरी सुरक्षित करण्यासाठी कौशल्ये आणि क्षमतांसह सर्व स्तरांचे शिक्षण पूर्ण करावे, त्यांच्या स्वतःच्या जीवनाबद्दल निर्णय घ्यावा आणि त्यांच्या समुदायासाठी आणि जगासाठी योगदान द्यावे असेही त्यांनी यावेळी सांगितले.

मुलींना शाळेत न पाठवण्यामागे लोकांची वेगवेगळी असतात एक म्हणजे हे त्यांना त्यांच्या घरगुती कर्तव्ये करण्यापासून रोखेल, दुसरे म्हणजे शाळेत जाण्यासाठी त्यांना सार्वजनिक ठिकाणी प्रवास करावा लागेल, तिसरे हे की लोकांना भीती वाटत होती की शाळा मुलींना घरापासून दूर नेईल. अशा प्रकारे शिक्षणाबद्दलचे महत्व न्यायाधीश बुद्रुक यांनी सांगितले.

या लघुपटाबद्दल विद्यार्थींनी कु. अचल भुतडा हिने आपले मत व्यक्त करत सर्वांचे आभार मानले.कायदेविषयक शिबीराची प्रस्तावना पंढरपूर अधिवक्ता संघाचे अध्यक्ष ॲड. अर्जुन पाटील व सचिव राहुल बोडके यांनी केली तर सूत्रसंचालन सहशिक्षीका श्रीमती मनिषा डंके यांनी केले.सदर शिबीरास पंढरपूर अधिवक्ता संघाचे अध्यक्ष ॲड.अर्जुन पाटील, उपाध्यक्ष ॲड. शशिकांत घाडगे, सचिव राहुल बोडके, सदस्य ॲड.शितल आसबे, अरिहंत पब्लिक स्कूलचे प्राचार्य श्रीमती सुप्रिया बहिरट, सहशिक्षीका श्रीमती मनिषा डंके, श्रीमती मनुताई गंभीरे, विधी सेवा समितीचे विधीस्वयंसेवक श्री. सुनिल यारगट्टीकर, श्री. ॲड.अंकुश वाघमोडे, श्री. पांडुरंग अल्लापूरकर, न्यायालयीन कर्मचारी श्री. मिलींद नरखेडकर, श्री. विशाल ढोबळे, श्री. अविनाश कांबळे, श्री. विवेक कणकी, श्री. एम. के. बनसोडे तसेच उपस्थित होते.

# सहकार शिरोमणी वसंतराव काळे साखर कारखान्यासाठी ९४ टक्के मतदान

पंढरपूर/प्रतिनिधी : सहकारीशिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्याच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी शनिवारी मोठ्या चुरशीने आणि शांततेत ९३.९७ टक्क्यांहून अधिक मतदान झाले. अनेक गावात शक्तिप्रदर्शन करीत रॅली काढून, एकाच रंगाचे फेटे बांधून सभासद मतदानास आल्याचे दिसून आले. काही उत्साही मतदारांनी मतदान केलेल्या मत पत्रिकांचे व्हिडिओ काढून ते सोशल मीडियावर व्हायरल केल्याचेही दिसून आले. मागील काही दिवसांपासून अत्यंत गाजत असलेल्या सहकारशिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळाच्या २० जागांसाठी शनिवारी सकाळी ८ वाजल्यापासून ३८ मतदान केंद्रांवर मतदानास सुरुवात झाली. सायंकाळी एकूण १० हजार ८८३ मतदारांपैकी ९ हजार ५२६ जणांनी मतदानाचा हक्क बजावला होता. विद्यमान अध्यक्ष कल्याणराव काळे यांना विठ्ठल कारखान्याचे अध्यक्ष अभिजित पाटील, सहकारशिरोमणीचे माजी संचालक दीपक पवार व स्वेरीचे संस्थापक सचिव डॉ. बी. पी. रोंगे यांनी आव्हान दिले होते. काळे यांना विठ्ठलचे माजी अध्यक्ष भगीरथ भालके, युवराज पाटील, ॲड. गणेश पाटील तसेच ठाकरे गटाच्या शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांची साथ मिळाली.

दरम्यान, शुक्रवारी दिवसभर कमालीच्या चुरशीने मतदान सुरू होते. सर्वच केंद्रावर सकाळपासून सभासद उत्साहाने मतदान करण्यासाठी येत होते. तालुक्यातील एकूण ३८ मतदान केंद्रांवर इतर गावातील सभासदांचे मतदान होते. मतदान केंद्रावर जाताना जवळच्या गावातील मतदार रॅली काढूनच जात असल्याचे दिसत होते. अनेक गावात मतदान केंद्रावर येताना सभासद एकाच रंगाचे फेटे बांधून आपल्या गटाचे शक्तिप्रदर्शन करीत होते. मात्र, यामुळे कोठेही वादावादी किंवा तणाव झाल्याचे वृत्त नाही. मतदान केंद्रनिहाय झालेले मतदान : पंढरपूर केंद्र २८२ पैकी २२१, कोर्टी केंद्र ३५४ पैकी ३१३, सोनके २८३ पैकी २६१, तिसंगी १६६ पैकी १४७, वाडीकुरोली ५३९ पैकी ५१३, वाखरी २८० पैकी २३१, आंबे ३२८ पैकी २८१, गादेगाव २२८ पैकी २०८, फुलचिंचोली ३३९ पैकी ३२८, करकंब २३८ पैकी २२७, पटवर्धन कुरोली ३०२ पैकी २९०, बोहाळी ११७ पैकी १०६, भाळवणी ३४६ पैकी ३०३, धोंडेवाडी ४०९ पैकी ३५४, पळशी ३६१ पैकी ३२१,गार्डी २१४ पैकी १८५, उपरी ३१३ पैकी २७३, तुंगत २५९ पैकी २३७, सरकोली २१२ पैकी १७०, चळे २४८ पैकी २२०, मुंडेवाडी २७६ पैकी २२५, रांझणी २०९ पैकी १७१, भंडीशेगाव ३७७ पैकी ३२३, कौठाळी ३१९ पैकी २६५, खेडभाळवणी २०९ पैकी १७३, शेळवे २८० पैकी २५२, मेंढापूर २७३ पैकी २५६, केसकरवाडी व शेंडगेवाडी ३४० पैकी ३१३, आढीव २६२ पैकी २४९, रोपळे ३२६ पैकी ३२१, तावशी ३५६ पैकी ३४९, भोसे ३६० पैकी ३३४ , पराची कुरोली ५३९ पैकी ४६७, उंबरे ३०४ पैकी २९०, कासेगाव २५६ पैकी २३२, खर्डी २१३ पैकी १६७, एकलासपूर ३२६ पैकी २७३ सोमवार, १८ रोजी सकाळी आठ वाजल्यापासून शासकीय धान्य गोदाम येथे मतमोजणी होणार आहे.

# आढेगाव केंद्रात त्वरित शिक्षक द्या

सोलापूर/प्रतिनिधी : टेंभुर्णीनजीक असलेल्या आढेगाव केंद्रात १९ शिक्षकांची कमतरता असल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून शिक्षकांची रिक्त पदे तातडीने भरावीत, अशी मागणी जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या अंजनादेवी पाटील यांनी प्राथमिक विभागाचे प्रभारी शिक्षणाधिकारी संजय जावीर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. आढेगाव केंद्रातील चांदज येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षक कमी आहेत. सदरची शाळा नदी काठावर असल्याने विद्यार्थ्यांना मोठा धोका आहे. त्यामुळे शिक्षण विभागाने या गावात शिक्षकांची नियुक्ती करावी. या शिवाय परिसरातील वाड्या-वस्त्यांवरील मुलांना शिक्षण मिळावे, या उद्देशाने शाळा काढण्यात आल्या आहेत. मात्र, या शाळांमध्ये शिक्षकांची संख्या कमी असून, आंतरजिल्हा बदलीने आलेल्या शिक्षकांची आढेगाव केंद्रातील शाळांमध्ये नियुक्ती करावी, अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे.

# नळदुर्ग येथील बुद्धनगर भागात निकृष्ठ दर्जाचे कामे ५२ लाखाचा धुराळा चौकशीची होतेय मागणी

नळदुर्ग/प्रतिनिधीः नळदुर्ग येथील दलित वस्तीत बुद्धनगर भागात अक्कलकोट रोड ते जिल्हा परिषद कन्या प्रशाला पर्यंत सिमेंट रोड करण्यात आला आसुन हा रोड निकृष्ठ दर्जाचे झाले आसल्याचे दिसुन येत आहे. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत जिल्हा परिषद कन्या प्रशाला ते अक्कलकोट रोड पर्यंत सिंमेट रस्ता तयार करण्यात आला आसुन आज ही ते अर्धवट अवस्थेत आहे . तरी ही नगर परिषद गुत्तेदार जगविण्याचे काम करत आहे आशा या निकृष्ठ दर्जाचे काम करून ५२ लाख रुपये किंमतीची कामाचा चक्क धुराळा उडाला आहे. या कामाकडे कोणी पहाणार आशा अधिकारी गुत्तेदारावर प्रशासनाने सदरील कामाची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी अशी मागणी राष्ट्रीय काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष शहबाज काझी यांनी केली आहे. सदरील कामाची वरिष्ठांनी तात्काळ चौकशी करून दलित वस्तीतील नागरीकांना न्याय मिळवून



द्यावा आशा प्रकारची मागणी होत आहे .

# पाण्याचा एक थेंबही वाया जाऊ नये याची काळजी घ्या, केंद्रीय पथक अधिकारी नीरज शर्मा यांचा सल्ला

सोलापूर/प्रतिनिधी : जलजीवन मिशनच्या कामामध्ये विशेषतः उंच, पाणी टाकीजवळ वॉटर मीटर लावणे, नळाच्या तोट्या तांत्रिकदृष्ट्या व्यवस्थित करून घेऊन पाण्याचा एकही थेंब वाया जाणार नाही या दृष्टीने काळजी घ्या, असा सल्ला केंद्रीय पथक अधिकारी नीरज शर्मा यांनी जिल्हा परिषद प्रशासनाला दिला. शुक्रवारी, जलजीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन ग्रामीण अंतर्गत सुरू असलेल्या कामांची पाहणी केंद्रीय पथकातील अधिकारी नीरज शर्मा व विकास वशिष्ठ यांनी केली. त्यावेळी त्यांनी जिल्हा परिषद प्रशासनास सूचना दिल्या. दक्षिण सोलापूर व अक्कलकोट तालुक्यातील जलजीवन मिशन कामाची पाहणी या पथकाने केली असून त्यात त्यांनी पाणी गुणवत्ताची तपासणी करण्याबाबत सूचना केल्या. भूजल विकास यंत्रणा कडील रिचार्ज शाफ्ट कामाची पाहणी केली. मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ईशाधीन शेळकंदे, अमोल जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषद सोलापूर अंतर्गत जलजीवन मिशनची कामे सुरू आहेत. भेटी दरम्यान वरिष्ठ भूवैज्ञानिक मुस्ताक शेख, कार्यकारी अभियंता सुनील कटकधोंड, भूवैज्ञानिक डॉ. कुलकर्णी, डॉ. साबळे उपस्थित होते. तसेच त्रयस्थ काम तपासणीचे सदस्य, नाबार्डचे सदस्य उपस्थित होते. मोडनिंब, अरण, बोरामणी, पिंजारवाडी, आलेगाव येथेही या पथकाने भेट दिली. याप्रसंगी उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव आदी प्रमुख उपस्थित होते.



# भक्ताभिमुख सेवेने श्री क्षेत्र अक्कलकोटचे नांव सर्वत्र : अनिरुद्ध जेवळीकर

अक्कलकोट/प्रतिनिधीः श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली सुरु असलेले भक्ताभिमुख सेवेने श्री क्षेत्र अक्कलकोटचे नांव सर्वत्र होत असून,



न्यासाकडून भविष्यात होणाऱ्या विकास कामांना माझे सर्वोतोपरी सहकार्य असेल असे मनोगत राज्याच्या नगर विकास विभागाचे उप सचिव अनिरुद्ध जेवळीकर (नगरविकास १८) मंत्रालय मुंबई यांनी व्यक्त केले.ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात आले असता न्यासाचे सचिव शामराव काका मोरे यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. या वेळी ते बोलत होते.यांच्या समवेत अक्कलकोट नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सचिन पाटील, न.प. आरेखक, मलिक बागवान, विठ्ठलराव तेली उपस्थित होते. यावेळी, न्यासाचे पुरोहित संजय कुलकर्णी, सौरभ मोरे, आप्पा हंचाटे, बाबुशा महिंद्रकर, अमित थोरात, एस.के. स्वामी, शावरेप्पा माणकोजी, सिद्धाराम कल्याणी, विनायक तोडकर, महादेव अनगले, धनप्पा उमदी, मल्लिकार्जुन बिराजदार, सतीश महिंद्रकर, शहाजीबापू यादव, नामा भोसले, बाळासाहेब घाडगे, श्रीनिवास गवंडी, प्रसन्ना बिराजदार, दत्ता माने, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, रमेश हेगडे, महांतेश स्वामी, धनंजय निंबाळकर, अनिल बिराजदार, मल्लिनाथ कोगनुरे, लाला निंबाळकर, कल्याण देशमुख यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

# भविष्यात भक्ती, सेवा, सहकाराचा वारसा चालविण्याकरिता प्रथमेश इंगळेंचे व्यक्तिमत्व सक्षम : नितीन जाधव

अक्कलकोट/प्रतिनिधीः येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन महेश इंगळे यांचे चिरंजीव प्रथमेश हे उमलत्या वयातच नेतृत्वाची कास धरत आहेत. त्यामुळे भविष्यात मंदीर समितीचे अध्यक्ष महेश इंगळे यांच्याप्रमाणे प्रथमेश इंगळे हेही भक्ती सेवा सहकाराचा वारसा चालविण्याकरिता सक्षम असल्याचे प्रतिपादन नाशिक येथील सहाय्यक पोलीस उप अधीक्षक नितीन जाधव यांनी केले. ते नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास सहकुटूंब भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. याप्रसंगी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांचे चिरंजीव प्रथमेश इंगळे यांनी नितीन जाधव व कुटुंबियांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन सन्मान केला. याप्रसंगी बोलताना नितीन जाधव यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. याप्रसंगी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, प्रसाद सोनार, गिरीश पवार, संजय पवार, विपुल जाधव, श्रीकांत मलवे, सागर गोंडाळ इत्यादी उपस्थित होते.

